नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २१५ Issue - 215 | वार रविवार दि. २२ डिसेंबर २०२४ Blow- Sunday Date 22 December 2024 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात...

### मुंबई गोवा महामार्गावर धावत्या बसला आग

अलिबाग : मुंबई गोवा महामार्गावर कोलाड इथे खाजगी प्रवासी बस जळून खाक झाली. रात्री १२ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. सुदैवाने यात कुठलीही जीवीत हानी झाली नाही. मात्र बससह प्रवाशांचे सर्व सामान जळून खाक झाले. धाटाव एम आयडीसी, दीपक नायट्रेट कंपनी यांचे अग्नीशमन दल, कोलाड रेस्क्यू टीम आणि पोलीस यांनी बचाव कार्य केले व आगीवर नियंत्रण आणले. बसमध्ये चालक आणि क्लिनरसह ३४ प्रवासी होते. खापरोबा ट्रॅव्हल्सची ही एसी स्लीपर कोच बस मुंबईतील जोगेश्वरी येथून मालवणकडे निघाली होती. कोलाड रेल्वे पुलाजवळ आली असता बसच्या मागील बाजूस मोठा आवाज झाला. तेव्हां ड्रायव्हरने गाडी थांबवून पाहिले असता बसने मागील बाजूस पेट घेतल्याचे दिसले. तातडीने बसमधील सर्व प्रवाशांना खाली उतरवण्यात आले. त्यानंतर आगीचा भडका उडाला.

## राज्य मंत्रिमंडळाचे खातेवाटप जाहीर

### मुख्यमंत्री फडणवीसांकडे गृहखातं, उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे नगरविकास तर उपमुख्यमंत्री पवारांकडे अर्थखातं

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

नागपूर : राज्यात महायुतीचं सरकार स्थापन झाल्यानंतर मंत्रिमंडळाचा विस्तार देखील पार पडला. त्यानंतर हिवाळी अधिवेशही झालं. मात्र, मंत्रिमंडळाचा विस्तार होऊन आठवडा झाला तरी खातेवाटप झालं नव्हतं. मात्र, अखेर आज राज्य मंत्रिमंडळाचं खातेवाटप जाहीर झालं आहे. यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृहखातं असणार आहे, तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे नगरविकास तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे अर्थखातं असणार आहे.




कोणाला मिळालं कोणतं खातं?

देवेंद्र फडणवीस : गृहखातं., एकनाथ शिंदे : नगरविकास आणि गृहनिर्माण.,अजित पवार : अर्थ आणि राज्य उत्पादन शुल्क., चंद्रशेखर बावनकुळे : महसूल., राधाकृष्ण विखे पाटील : जलसंधारण., हसन मुश्रीफ : वैद्यकीय शिक्षण., चंद्रकांत पाटील : उच्च तंत्र शिक्षण., गिरीश महाजन : जलसंपदा., गुलाबराव पाटील : पाणीपुरवठा., धनंजय मुंडे : अन्न व नागरी पुरवठा., दादाजी भुसे : शालेय शिक्षण., गणेश नाईक : वनखातं., संजय राठोड : माती व पाणी परीक्षण खात., मंगलप्रभात लोढा : कौशल्य विकास., उदय सामंत : उद्योग व मराठी भाषा., जयकुमार रावल : विपणन., पंकजा मुंडे : पशुसंवर्धन आणि पर्यावरण., अतुल सावे : ओबीसी विकास, दुग्धविकास., अशोक उईके : आदिवासी विकास., शंभूराज देसाई : पर्यटन व खाण स्वातंत्र्य सैनिक कल्याण मंत्रालय., आशिष शेलार : माहिती व तंत्रज्ञान., दत्तात्रय भरणे : क्रीडा व अल्पसंख्याक विकास., अदिती तटकरे : महिला व बालविकास., शिवेंद्रराजे भोसले : सार्वजनिक बांधकाम., माणिकराव कोकाटे : कृषी., नरहरी झिरवाळ : अन्न व औषध प्रशासन., जयकुमार गोरे : ग्रामविकास आणि पंचायत राज., संजय शिरसाट : सामाजिक न्याय., भरत गोगावले : रोजगार हमी व फलोत्पादन., नितेश राणे : मत्स्य आणि बंदरे., प्रताप सरनाईक : वाहतूक., बाबासाहेब पाटील : सहकार., मकरंद पाटील : मदत व पुनर्वसन., प्रकाश आबिटकर : सार्वजनिक आरोग्य कुटुंब कल्याण

राज्यमंत्री, कोणाकडे कोणतं खातं?

माधुरी मिसाळ : सामाजिक न्याय,अल्पसंख्याक विकास वैद्यकीय शिक्षण., आशिष जयस्वाल : अर्थ आणि नियोजन आणि विधी व न्याय., इंद्रनील नाईक : उच्च आणि तंत्र शिक्षण आणि आदिवासी विकास., मेघना बोर्डीकर : सार्वजनिक आरोग्य, कुटुंब कल्याण., योगेश कदम : गृह राज्य शहर., पंकज भोयर : गृह निर्माण

## तोवर शांत बसणार नाही, संतोष देशमुख हत्या प्रकरणावरून शरद पवारांचा मस्साजोगमधून सरकारला इशारा

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

बीड : ज्येष्ठ नेते शरद पवारांनी आज बीडमधील मस्साजोग या गावी जाऊन या गावचे दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट सांत्वनपर भेट घेतली. यावेळी उपस्थितांशी संवादही साधला. त्यानंतर त्यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की संतोष देशमुख यांच्या हत्येने सर्वसामान्य लोकांना धक्का बसलाय. बीड जिल्ह्याचा महाराष्ट्रात एक लौकिक आहे. मी अनेक वर्षांपासून या ना त्या निमित्ताने या जिल्ह्याची संबंधित आहे. वारकरी संप्रदाय हे या जिल्ह्याचे वैशिष्ट्य आहे. त्या वारकरी संप्रदायाचा विचार घेऊन आपले आयुष्य जगणारे, दुष्काळ काळात त्याला तोंड देणारे, महाराष्ट्राच्या साखर उद्योगाला हातभार लावणारे आणि त्याप्रती कष्ट करणारे कुणी आहेत हा प्रश्न विचारला तर बीडचा उल्लेख हा केला जातो. अशा जिल्ह्यात जे काही घडलं हे कोणालाही न पटणारं, न शोभणारं अतिशय चमत्कारीक कशा प्रकारचं आहे.



शरद पवार म्हणाले, ज्या तरुण सरपंचाची हत्या झाली. पंधरा वर्ष लोकांचा पाठिंब्याने त्या पदावर बसण्याचं काम ज्यांनी केलं. पंधरा वर्ष ज्याअर्थी निवड झाली त्याचा अर्थ लोकांच्या दैनंदिन सुखदुःखाची समरस होणारा, वादविवादापासून दूर राहणारा असा हा तरुण, कर्तबगार लोकप्रतिनिधी म्हणून तुमच्या गावांमध्ये काम करतोय. जे काही घडलं त्याच्यात त्यांचा काही संबंध नसताना, कोणी येऊन कोणाला दमदाटी केली. कोणाला मारहाण केली आणि त्याच्याबद्दलची तक्रार आल्यानंतर त्याची चौकशी करण्याची भूमिका घेतली आणि ती चौकशी का करतोय म्हणून कुणी बाहेरून येतं, व्यक्तिगत हल्ला केला जातो आणि शेवटी तो हल्ला हत्येपर्यंत जातो हे चित्र अतिशय गंभीर अशा प्रकारचं आहे. याची नोंद राज्य आणि केंद्र सरकारला घ्यावीच लागेल.

ज्येष्ठ नेते पवार म्हणाले, लोकसभेचं अधिवेशन काल संपलं. गेले दोन-चार दिवस आम्ही बघतो आहोत, तुमचे (जनतेचे) प्रतिनिधी बजरंग सोनवणे, निलेश लंके असतील आणि जे कोणी खासदार तिथे महाराष्ट्राचे आहेत त्यांनी हा प्रश्न उचलून धरला. गृहमंत्र्यांना भेटले. संसदेत हा प्रश्न मांडून इथे न्याय द्या या प्रकारचा आग्रह बजरंग सोनवणे आणि त्यांच्या सगळ्या सहकाऱ्यांनी देशाच्या लोकसभेमध्ये मांडला. त्यांचे भाषण ऐकत होतो. मी काही त्यांच्या सभागृहाचा सदस्य नाहीये पण ऐकत होतो. सबंध सभागृह, ते जे काही सांगत होते ते ऐकल्यानंतर स्थगित झालं. या देशातील राज्यात काय चाललंय? अशा प्रकारचे प्रश्न नंतर लोक विचारायला लागले.

शरद पवार म्हणाले, मी स्वतः थोडीबहुत माहिती घेतली. त्याच्यामध्ये सोळंके आणि इतर काही लोक बोलले. एक या जिल्ह्याचा लोकप्रतिनिधी, शेजारच्या जिल्ह्याचा लोकप्रतिनिधींनी हा प्रश्न महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये सुद्धा मांडला. मुख्यमंत्र्यांनी काही आश्वासने दिलीत. त्यांनी काही रक्कम दिली. ठीक आहे. कुटुंबाला त्याची मदत होईल. पण तुम्ही कितीही मदत दिली तरी गेलेला माणूस येत नाही. त्या कुटुंबाचं हे दुःख आहे ते काही जाऊ शकत नाही. पण ठीक आहे आम्ही काही त्याच्या खोलात जाऊ इच्छित नाही. त्याच्यावर टिप्पणी करू इच्छित नाही. पण एक गोष्ट करावी लागेल की जोपर्यंत त्याच्या खोलात जाऊन जे कोणी जबाबदार आहेत आणि जे कोणी सूत्रधार म्हणून याच्या मागे आहेत त्यांना योग्य प्रकारचा धडा शिकवल्याशिवाय शांत बसायचं नाही. मला आनंद आहे आणि एका गोष्टीचं समाधान आहे की त्या वकील मंडळींनी लेखी निवेदन दिलं. जे काही करायचं असेल तर ती जबाबदारी ते स्वतः ही घ्यायला तयार आहेत. तुम्हाला त्यांचीही साथ या ठिकाणी होती. म्हणून केंद्र सरकार, राज्य सरकार, लोकप्रतिनिधी, वकील मंडळी आणि या जिल्ह्यातील आजूबाजूचे अनेक लोक तुमचे हितचिंतक म्हणून या प्रश्नाकडे, आणि कुटुंबीयांच्या मागे आहेत.

## महाविकास आघाडी म्हणते; सरकारने शेतकरी, कष्टकरी, तरुण, उद्योजकांच्या तोंडाला पाने पुसली!

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

नागपूर : सरकारने हिवाळी अधिवेशनात विदर्भासह महाराष्ट्रातील शेतकरी, कष्टकरी, तरुण, उद्योजकांच्या तोंडाला पाने पुसली, असा आरोप अधिवेशनाचे सूप वाजल्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत विरोधी पक्षाच्या नेत्यांनी केला.विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे म्हणाले, अधिवेशनाच्या एक दिवसापूर्वी मंत्रिमंडळ स्थापन होऊनही बिन खात्याच्या मंत्र्यांचे अधिवेशन झाले. मागील काळातील योजना व खोटे दिवा स्वप्न दाखवण्याचे काम या सरकारने केले. शेतकरी, कामगार,युवक व बेरोजगारांना कोणतेही न्याय व मदत सरकारने जाहीर केली नसल्याचा आरोपही दानवे यांनी केला.



एसटी बस खरेदीतील गैरव्यवहार, बोगस औषधे, राज्यातील बिघडलेली कायद्या सुव्यवस्था, शेतकऱ्यांचे प्रश्न आदी विषयांवर विरोधी पक्ष म्हणून महाविकास आघाडीच्या आमदारांनी दोन्ही सभागृहात सरकारला सळो की पळो करून सोडले. महाविकास आघाडीची हीच भूमिका यापुढे असेल. तसेच जनतेच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून आंदोलन केले जाईल.

बीडचे सरपंच संतोष देशमुख हत्येतील आरोपी वाल्मिकी कराड फरार आहे. वाल्मिकी कराड नागपुरात असल्याचे मी सांगितले. परंतु पोलिसांनी आरोपीला शोधण्यासाठी मला एक शब्दही विचारला नाही. परभणी येथील तरुण सोमनाथ सूर्यवंशी मृत्यमप्रकरणी अद्याप कोणावरही कारवाई झाली नाही. मराठी कुटुंबावर हल्ला कल्याण येथे परप्रांतीय माणसाने मराठी कुटुंबावर हल्ला केला, आदी घटना हे सरकार आल्यावर घडल्या. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी संसदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान केला. त्यावर माफी मागण्याऐवजी विरोधकांनी काय काय केले हे भाजपचे नेते सांगत राहिले. कांदा निर्यात धोरण बदलण्यासाठी केंद्राकडे जाण्याची गरज आहे. शेतकऱ्यांना मदतीची घोषणा, विमा, प्रोत्साहन नाही, असा आरोपही दानवे यांनी केला. या पत्रकार परिषदेला काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे आमदार सचिन अहिर, सुनील प्रभू उपस्थित होते.

मविआ सरकारने पहिल्या अधिवेशनात शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली. पण युती सरकारने शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन देऊनही घोषणा केली नाही. गडचिरोलीत विपुल खनिज संपत्ती आहे. ती लाडका उद्योगपती लुटत आहे. धारावी प्रकल्प अदानीलाच देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. बीडची घटना माणुसकीला काळीमा बीड व परभणीतील घटना माणुसकीला काळीमा फासणाऱ्या असून सरकारने गुंड पोसल्याचा हा परिणाम आहे. परभणी प्रकरणात फक्त एका पोलीस अधिकाऱ्याची बदली करण्यात आली. निष्णात वकिलाप्रमाणे मुख्यमंत्र्यांनी बीड प्रकरणात एका मंत्र्याला वाचवण्याचा प्रयत्न केला. मुख्यमंत्री आपली खूर्ची वाचवण्यासाठी मित्रपक्षांच्या मंत्र्यांना घाबरतात, असा आरोपही पटोले यांनी केला.

**राहुल गांधी परभणीला भेट देणार**

राहुल गांधी हे सोमवारी परभणीला भेट देणार आहेत. पोलीस लाठीमारात मृत्यू झालेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबाला ते भेट देणार आहेत. त्यांना बीड दौऱ्याबाबतही कार्यक्रम दिला आहे. त्यावर लवकरच निर्णय होईल, असे पटोले यांनी सांगितले.

### अजित पवारांचं संतोष देशमुखांच्या कुटुंबियांना आश्वासन

### कुटुंबियांची सांत्वनपर घेतली भेट

## मास्टरमाईंड कोणी असो, त्याला सोडणार नाही

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

बीड : बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची काही दिवसांपूर्वी हत्या झाली. या घटनेनंतर राज्यात मोठी खळबळ उडाली. या घटनेचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रात उमटले. तसेच याचे पडसाद विधानसभा आणि लोकसभेमध्येही उमटले. महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधानसभेत आणि खासदारांनी लोकसभेत हा विषय मांडून न्याय देण्याची मागणी केली. यानंतर आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी मस्साजोग गावात जाऊन संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेतली. त्यानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेत या घटनेतील मास्टरमाईंड कोणीही असो, त्याला सोडणार नाही. आरोपींवर कारवाई करण्यात येईल, असं आश्वासन अजित पवार यांनी संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांना दिलं आहे.

ही घटना खूप वेदनादायी आहे. आम्ही या प्रकरणाची दोन प्रकारे चौकशी करण्याचा निर्णय घेतला आहे. खरं तर ही घटना माणुसकीला काळिमा फासणारी आहे. तुमच्यावर मोठा अघात झाला आहे. आता गेलेली व्यक्ती परत येऊ शकत नाही. मात्र, या प्रकरणात ज्यांचे कोणाचे लागेबांधे असतील आणि जो कोणी मास्टरमाईंड असेल त्या कोणालाही आम्ही सोडणार नाही. पोलिसांनी देखील यावर ॲक्शन घेतली आहे, असं अजित पवार यांनी म्हटलं. संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची भेट घेतल्यानंतर गावकऱ्यांशी बोलताना अजित पवार म्हणाले, तुमच्या गावामध्ये जी घटना घडली त्या घटनेचं दुःख आहे. मी तुम्हाला हा विश्वास देण्यासाठी आलो आहे की, कोणत्याही परिस्थितीत कोणताही राजकीय हस्तक्षेप या प्रकरणात होणार नाही. माझा तुम्हाला शब्द आहे की कोणालाही पाठीशी घातलं जाणार नाही. यामध्ये जो कोणी मास्टरमाईंड आहे, त्यालाही सोडलं जाणार नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील सभागृहात आरोपींवर कारवाई करण्याचं आश्वासन दिलं आहे. या घटनेची आम्ही दोन प्रकारे चौकशी करणार आहोत. एक म्हणजे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याच्या माध्यमातून आणि न्यायालयीन चौकशी देखील करणार आहोत. यामध्ये काही त्रुटी राहणार नाहीत याची काळजीही घेतली जाईल, असं आश्वासन अजित पवारांनी मस्साजोगच्या ग्रामस्थांना दिलं.



## कल्याणमधील मारहाण प्रकरणातील आरोपी अखिलेश शुक्लासह इतर आरोपींना सहा दिवसांची पोलीस कोठडी

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

कल्याण : कल्याण येथील योगीधाम अजमेरा हाईट्स संकुलातील एका कुटुंबाने (शुक्ला) धूप अगरबत्ती लावली आणि त्या धुराचा त्रास होतो या कारणामुळे त्यांच्या शेजाऱ्यांशी भांडण झालं. या इमारतीतील अखिलेश शुक्लाच्या कुटुंबाने त्यांच्या शेजाऱ्यांबरोबर वाद घातला. या वादाचं रुपांतर मोठ्या हाणामारीत झालं. शुक्लाने गुंडांची टोळी बोलावून शेजारी राहणाऱ्या देशमुख कुंटुंबाला मारहाण केली. यामध्ये दोन जण जबर जखमी झाले आहेत. शुक्ला व त्याच्या १० गुंडांनी मराठी कुटुंबियांना बेदम मारहाण करत धारदार शस्त्राने त्यांच्यावर हल्ला केला. मराठी समुदायाचा उल्लेख करत शिवीगाळ केली. त्यानंतर देशमुख कुटुंबाने पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी सुरुवातीला देशमुख कुटुंबाची फिर्याद नोंदवण्यास टाळाटाळ केली. अखेर नागरिकांच्या रोषानंतर पोलिसांनी शुक्लाविरोधात गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतलं. तसेच त्याने बोलावलेल्या गुंडांच्या टोळीतील सहा जणांना ताब्यात घेतलं.

दरम्यान, पोलिसांनी आज शुक्ला व त्याच्या साथीदारांना न्यायालयासमोर हजर केलं. त्यानंतर न्यायालयाने शुक्ला व त्याच्या साथीदारांची सहा दिवसांसाठी पोलीस कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. पोलीस या प्रकरणाचा तपास करून, शुक्लासह त्याच्या साथीदारांची चौकशी करून सहा दिवसांनी न्यायालयासमोर साक्षीपुरावे सादर करतील.

कल्याण मारहाण प्रकरणातील अखिलेश शुक्ला, त्याची पत्नी गीता व इतर चार आरोपींना कल्याण न्यायलयात उभे करण्यात आले होते. शुक्ला पती-पत्नींसह चार जणांना सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या प्रकरणात जाणून-बुजून वाद निर्माण केला जात आहे, मराठी-हिंदी असा काही वाद नाही, असं आरोपीचे वकील अनिल पांडे म्हणाले. आरोपी आणि फिर्यादी यांच्यामध्ये अगरबत्ती लावण्यावरुन वाद झाले होते त्यानंतर मारहाण करण्यात आली. उर्वरीत आरोपी फरार आहेत, त्यांचा शोध चालू आहे. या प्रकरणामुळे प्रांतवाद सुरु झाला आहे त्याकडे सरकारने लक्ष द्यावे, असे फिर्यादीचे वकील हरीश सरोदे म्हणाले.

# डव्वा येथील धम्मकुटीवर 'प्रबोधनातून समाज परिवर्तन सोहळ्याचे' आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सडक अर्जुनी : डव्वा येथील सम्यक संकल्प धम्मकुटीवर २४ व २५ डिसेंबर ला दोन दिवशीय 'प्रबोधनातून समाज परिवर्तन सोहळ्याचे' आयोजन करण्यात आले आहे. दि.२४ डिसेंबर ला सकाळी ५ वाजता वंदना पूजा व मंगलमैत्री, सकाळी ९ वाजता वडेगाव चे किराणा दुकानदार श्री बडोले यांचे हस्ते धम्मध्वजारोहण



, सकाळी ९.३० वाजता भदंत संघधातू यांच्याद्वारे धम्मध्वज वंदना व शिलग्रहण करण्यात येणार आहे.

सकाळी १० वाजता जिल्हास्तरीय सांस्कृतिक महोत्सव (समूह नृत्य )' आदर्श आपल्या महापुरुषांचा ' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमाचे उदघाटन माजी मंत्री तथा आमदार इंजी. राजकुमार बडोले यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सालेकसा येथील प्राध्यापक पूर्ती महाविद्यालयाचे संस्थापक राजेंद्र बडोले राहणार आहेत. याप्रसंगी मुख्य मार्गदर्शक म्हणून नागपूरचे माजी जिल्हाधिकारी सदानंद कोचे, भंडाराचे माजी न्यायाधीश महेंद्र गोस्वामी, सामाजिक कार्यकर्ते शुद्धोधन शहारे, विश्वजीत डोंगरे, जुगनू रंगारी, विदेश टेंभूर्णे, सुखदास मेश्राम, चंद्रकांता मेश्राम, अभिजित रामटेके, पिंटू गजभिये आदी उपस्थित राहणार आहेत.

२५ डिसेंबर ला सकाळी ६ वाजता मंगलमैत्री, अल्पोपहार व संघदान, सकाळी ९ वाजता दीक्षितांना धम्मदीक्षा विधी समारोह कार्यक्रम आणि दुपारी १२ वाजता मनुस्मृती दहन कार्यक्रम सामाजिक कार्यकर्ते श्री बघेले, श्री कावळे उपस्थित पार पडणार आहे.

दुपारी ३ वाजता ' बा भीमा तुझ्यामुळे 'हा प्रबोधनात्मक कार्यक्रम बल्लारशा येथील आदेशभाऊ व संच सादर करणार आहेत. या कार्यक्रमाचे उदघाटन भंडाराचे डी. वाय. एस. पी. श्री इलमकर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तिरोड्याचे माजी आमदार दिलीप बन्सोड राहणार आहेत. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून नवोदय विद्यालयाचे प्रोफेसर एम. आर. बलवीर, गोंदियाचे संजयदादा गणवीर, नागपूरचे कामगार अधिकारी कृष्णा दुबे, नागपूरचे बी.डी.ओ. सत्येन्द्र तामगाडगे, नवोदय विद्यालयाच्या बलवीर म्याडम, गोंदियाच्या शिक्षिका मेश्राम तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री गजभिये, गजभिये म्याडम व गोंदियाचे नेत्रतज्ज्ञ डॉ. मोहीतकुमार गजभिये आदी उपस्थित राहणार आहेत.

सदर दोन दिवशीय कार्यक्रमाला भिक्खु संघ व इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक, सम्यक संकल्प बुद्धिस्ट समिती डव्वा/पळसगावच्या वतीने करण्यात आले आहे.

# लोह्यात श्री संत रंगनाथ महाराज परभणीकर यांच्या पुण्यस्मरणानिमित्त रक्तदान शिबीर

## लोह्यातील भव्य रक्तदान शिबीरात तब्बल १०० रक्दांत्यानी केले रक्तदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोहा/प्रतिनिधी : स्वानंद सुखनिवासी,वेदांत केसरी,ब्रह्मीभूत श्री संत रंगनाथ गुरुजी परभणीकर यांच्या पुण्यस्मरणानिमित्त नगरेश्वर मंदिर लोहा येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन काल दि.१९ सप्टेबर रोजी करण्यात आले होते. सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत रक्त दान शिबिर घेण्यात आले. तत्पूर्वी प्रथमत; हभप सखाराम महाराज व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

यावेळी माजी नगराध्यक्ष किरण सावकार वट्टमवार,नगरेश्वर मंदिर लोहाचे अध्यक्ष दिनेश सावकार तेललवार व समस्त आर्य वैश्य युथ आदींच्या उपस्थितीत भव्य रक्तदान शिबीर संपन्न झाले.सदरील रक्तदान शिबिरात तब्बल १०० रक्तदांत्यानी रक्तदान केले.

भव्य रक्तदान शिबिराचे आयोजक शंकर सावकार वट्टमवार, राजेश कोटलवार, राहुल कोंडावार, प्रविण अंकूलवार,





अमोल मोटरवार, वसंत उत्तरवार, सोमनाथ पालिमकर, अदित्य बिडवई, ऋषिकेश तेललवार, गौरव दमकोंडवार, संकेत मोतेवार, उमेश बिडवई, गजानन कटकमवार, भुषण दमकोंडवार व सर्व आर्य वैश्य समाज बांधवांनी भरपूर परिश्रम घेतले.

# मास्टर गेम्स असोसिएशन स्पर्धेमध्ये निलिमा साळुंखे मुंबई यांना प्रथम क्रमांकाचे मानांकन






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक/विजय घनघाव : मास्टर गेम्स असोसिएशन (रजि.)महाराष्ट्र यांच्या वतीने नाशिक येथे नुकत्याच धावण्याच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धा दि. १४ आणि १५ डिसेंबर रोजी नाशिक येथे आयोजिल्या होत्या. सदर स्पर्धेमध्ये ४० वयोगट आणि पुढील वयोगटात निलिमा साळुंखे यांनी बाजी मारली आहे. त्यांना या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचे नामांकन प्राप्त झाले आहे. सदर स्पर्धा ही ५ किलोमीटर अंतर पार करणे यासाठी होती. हे अंतर पार करण्यासाठी निलिमा साळुंखे यांना तब्ब्ल ४७ मि. आणि ४३ सेकंद इतका वेळ लागला आहे. परिसरातील नागरिकांकडून निलिमा साळुंखे मुंबई यांचं कौतुक केलं जात आहे.

# भारतीय सविंधानाचा प्रतीकृतीचे अवमान केल्याने बॉबी बहुउद्देशीय समाज विकास संस्था वतीने निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनीधी : परभणी शहरातील भारतरत्न डाँ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरातील सविंधानाची प्रतिकृती एका समाजकंटक इसमाने जागेवरुन काढून तिचा आवमान केला.

या कृतीचा निषेध करण्यासाठी माननीय निवासी जिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांना निषेधाच पत्रक देण्यात आले.ही कृती करण्यार्या समाजकंटकास योग्य ती कारवाई करुन शासन करण्यात यावे. निवासी जिल्हाधिकारी यांना निषेध पत्रक देताना संस्थेचे संस्थापक अजित भाऊ गायकवाड ,अश्विन गायकवाड ,महेश गजधाने ,सुधिर बिडबाग, प्रबुध्दकुमार दोड्यानूर,सचिन



गायकवाड, शिवाजी थोरात, बापु वाघमारे, सुदत्त कांबळे अमोल रोकडे, आशु लोंढे, बापु जानराव अभिजीत कांबळे,सागर जगदाळे ,अतिश होसमणी,सुभाष सिताफळे,अमोल वाघमारे, विशाल कांबळे उपस्थित होते.

# राज्याचे कॅबिनेट मंत्री नामदार दत्तात्रय भरणे यांचा आज भव्य नागरी सन्मान सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापुर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : २०२४ ची इंदापूर विधानसभेची निवडणूक अत्यंत चुरशीची आणि लक्षवेधी झाली. दत्तात्रय भरणे यांनी २०१४ साली प्रथम राज्याचे माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांना पराभूत केलं आणि भरणे विधानभवनात जाऊन पोहोचले.त्यानंतर २०१९ ला ही भरणे यांनी विजयाची दौड कायम ठेवली.

त्यानंतर २०२४ च्या निवडणुकीत भरणे विजयाची हॅटट्रिक पूर्ण करणार की पाटील आपल्या पराभवाचा बदला घेणार याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष



होतं.मात्र या निवडणुकीत ही दत्तात्रय भरणे यांनी जवळपास २० हजाराच्या मताधिक्यानं विजय प्राप्त केला आणि दत्तात्रय भरणे थेट कॅबिनेट मंत्री झाले. नुकताच महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार झाला असून यात दत्तात्रय भरणे यांनी कॅबिनेट मंत्रीपदाची शपथ घेतली आहे. शपथ विधीनंतर लागलीच नागपूरला हिवाळी अधिवेशन सुरू झालं. राज्याच्या कॅबिनेट मंत्रीपदी वर्णी लागल्यानंतर दत्तात्रय भरणे हे प्रथमच रविवारी २२ डिसेंबर रोजी इंदापूरला येत आहेत.

दत्तात्रय भरणे यांची कॅबिनेट मंत्री पदी वर्णी लागल्यानिमित्त इंदापूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व महायुतीचे सर्व घटक पक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने भरणे यांचा जाहीर नागरिक सत्कार आयोजित करण्यात आला असून दुपारी तीन वाजता इंदापूर शहरातील वाघ पॅलेस हा सोहळा पार पडणार आहे.

# ठाकरे शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी व सहसंपर्कप्रमुख नामदेव चाळक यांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर :लातूर जिल्हा शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाची बैठक जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. लातूर जिल्हातील पक्षाची बांधणी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या बाबतीत सविस्तर चर्चा करण्यात आली विधानसभा निवडणुकी नंतर प्रथमच पक्षाची जिल्हा बैठक आयोजित करण्यात आली होती या बैठकीत नवीन जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी व सहसंपर्कप्रमुख नामदेव चाळक यांचा जिल्हा पदाधिकाऱ्यांच्या वतीने




सत्कार करण्यात आला.

या बैठकीस लिंबन महाराज रेशमे महिला जिल्हा संघटक जयश्री उटगे, सौ. सुनीता चाळक, महानगर प्रमुख सुनील बसपुरे, युवती प्रमुख अँड. श्रध्दा जवळगेकर, युवा सेना प्रमुख दिनेश जावळे, निलंगा तालुकाप्रमुख अविनाश रेशमे, उपजिल्हाप्रमुख हरिभाऊ सगरे, संतोष सुर्यवंशी, शेतकरी सेना जिल्हाध्यक्ष विलास लंगर, सहकार सेना जिल्हाध्यक्ष किशोर जाधव, खरेदी विक्री संघाचे उपसभापती शेखर चव्हाण, देवणी तालुका प्रमुख मुकेश सुडे शिवाजी चव्हाण, व्यापारी आघाडी जिल्हाध्यक्ष बसवराज मंगरूळे अँड. रवी पिचारे, संजय उजळबे, रेखा पुजारी, दैवशाला सगर, सुनीता भोसले, सतीश शिवणे, सुनील नाईकवाडे, शंकर रांजनकर, रमेश माळी यांच्या सह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पावलांच्या वावर भुमिवर एकात्मिक शिक्षण हे पुस्तक ठेवून विद्यार्थ्यांना अक्षर भेट सादर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सातारा/प्रतिनीधी

आई आणि शाळा या दोन्ही भूमिका मुलांच्या वाट्याला येतात काही मुलांना आईच मिळते शाळा मिळत नाही. बाबासाहेब आंबेडकरांना सातारची शासकीय शाळा प्रवेश च्या निमित्ताने प्रथम प्राप्त झाले तेथील त्यांचे सगळे बालपणाचे भावविश्व भयग्रस्त उपेक्षेचे होते. त्या सगळ्या भावा विश्वाचा आज समकाला मध्ये आढावा कसा घेता येईल बाबासाहेबांच्या मनातील ज्ञान प्रेरणा संघर्ष प्रेरणा अक्षरांची ओळख ही सर्व इथेच झाली असेल का? अक्षरांचा जीवनभरचा प्रवास प्रिय बाबांचा हा भारत वर्षातील क्रांतिकारक अचंबित करणारा असा इतिहास ठरला आहे ते मुक्तीचे तत्त्वज्ञान ठरले आहे .ते भारत निर्माण असे पायाभूत कार्य आहे. या आठवणींना या प्रसंगांना या घटनांना या इतिहासाला आपण कसे सामोरे जावे ?

हे कळत नाही. बाबासाहेब कळणे हे जीवन कळले आहे. बाबासाहेब वाचणे हे मुक्तीच्या वाटेवरून चालले आहे बाबासाहेबांना समजावून घेणे. हे मानवतेच्या दिशेने चालणे आहे. बाबासाहेबांना अक्षरातून भेटणे ही अक्षराची मुक्ती मिळवण्याचे छोटे-छोटे क्षमतेप्रमाणेचे प्रयत्न आहेत. बाबासाहेबांचा अक्षर प्रवास हा साताऱ्यातून झाला या अक्षर प्रवासाच्या ठिकाणी आपली मूर्ती तोडकी अक्षरे त्या भूमीला त्या शाळेला त्या मुलांना भेट द्यावीत. असा एक वेडगळ विचार नव्या पिढीतील पुन्हा कार्यकर्त्यांच्या शिक्षकांच्या मनात आला तर त्याचे महत्त्व काय असते. त्याची प्रसंगीकता आणि भावनिकता आणि एकरूपता याला महत्त्व काय आहे हे कळत नाही, पण तरीही भावनिकता ही प्रासंगिकतेला अनुरूप ठरते का हे इतिहास ठरवतो हे भविष्यात ठरते. पण वर्तमानातील संवेदना फार मोठी आणि महत्त्वाची असते म्हणूनच बाबासाहेबांच्या अक्षर वाटेवरील हा छोटा अधूरा आकलनाचा कार्यकर्ता २० डिसेंबर २०२४ रोजी आपली एकात्मिक शिक्षणाची अक्षरे अर्थातच प्राथमिक स्तरावरील माध्यमिक स्तरावरील महाविद्यालयीन स्तरावरील शिक्षणावरील चिंतन पर पुस्तक घेऊन प्रताप सिंह हायस्कूल सातारच्या शाळेत जातो आणि तो तेथील खेळणाऱ्या शाळेतील मुलांना एकत्र करतो. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या या भूमीला या शाळेला वंदन असो अशा घोषणा मुलांच्या समवेत देतो आणि मुलांना सांगतो

एकात्मिक शिक्षण मुलांचे शिक्षण, एकात्मिक शिक्षण विचाराचे शिक्षण, एकात्मिक शिक्षण लेखनाचे शिक्षण , एकात्मिक शिक्षण तर्क करण्याचे शिक्षण, एकात्मिक शिक्षण अस्खलित बोलण्याचे शिक्षण, एकात्मिक शिक्षण समस्या निरसनाचे शिक्षण एकात्मिक शिक्षण मानवतेचे शिक्षण

असे छोटे विचार मुलांना सांगून त्यांच्या हातात पुस्तक देऊन आम्ही मुले छान छान पुस्तक वाचून छान छान अशा घोषणा देतो भावनिक बोलावलेल्या डोळ्यांनी आणि फोटो काढून घेतो. पुस्तक भेट देऊन परत फिरतो.

या भावनिक वेडेपणाचे अर्थ काय असतात? भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या बालपणाचा प्राथमिक शाळेचा पहिल्या दिवसाचा तो प्रसंग वर्तमानत कसा जपायचा ?नव्या बालकांना बाबासाहेबांच्या जाणीव जीवन चरित्र प्रेरणा अक्षरातून कशा पोहोचवायच्या हा एक भावनिकतेचा संवेदनशीलतेचा व वर्तमानाशी जोडण्याचा प्रयत्न प्रस्तुत कार्यकर्ता शिक्षक करतो आणि मुलांना विनंती करतो. शिक्षकांना विनंती करतो. हे एकात्मिक शिक्षण पुस्तक वाचन करा शिक्षकांना सांगतो मुलांनाही पुन्हा पुन्हा मुलचे कसे ?मूल बोलते कसे ?मूल वाचते कसे? याबद्दलचे यातील लेख वाचून दाखवा लिहून काढावयास सांगा? मुले पुस्तक हातात घेऊन नाचू लागतात. टाळ्या वाजवतात. आणि हा कालचा शिक्षक आजही निवृत्तीनंतर मुलांच्या या टाळ्या निरागस हास्य पाहून अक्षरांच्या वाटेवर ही मुले कधी चालू लागतील .अशी आशा मनात बाळगून अनामिक भविष्याची भीती बाळगून पुन्हा प्रतापचे हायस्कूल मधून बाहेर पडतो, पण बाबासाहेब असेच




अनामिक भीतीतून बाहेर पडले. अंध काराच्या भारतीय संस्कृतीला त्यांनी चिकित्साच्या तुरुंगात उभे केले. असा भारतीय प्रत्येक युवक तयार होईल का त्यासाठी एकात्मिक अक्षरे त्यांच्या हाती पोहोचतील का ?बाबासाहेबांच्या पावलांचा जिथे वावर झाला. त्याच भूमीला वंदन करणे. तिथूनच अक्षरांची पाऊलवाट सुरू व्हावी असे वाटत राहणे. हे बाबासाहेबांनाच भेटत राहण्यासारखे आहे.

काळ हा संवेदनेत पकडता येतो. भूतकाळ हा भावनेशी जोडता येतो. वर्तमानाच्या दुःखाला या दोन्हीही काळाचे संदर्भ जोडता येतात. म्हणूनच हा भावनेचा ओथंबलेला एकात्मिकशिक्षण पुस्तकाचा अर्थातच त्यातील अक्षरांचा प्रसार असा करण्याचा मुलांच्या हातात पुस्तक देण्याचा हा अक्षर यात्रेचा प्रयत्न चालू राहील .त्याचा प्रारंभ २० डिसेंबर २०२४ रोजी पावणे बारा वाजता केला तो हा क्षण.

शिवाजी सोनुबाई पांडुरंग रामचंद्र राऊत हे नुकत्याच प्रकाशित एकात्मिक शिक्षण या पुस्तकाचे लेखक आहेत

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

रविवार दि. २२ डिसेंबर २०२४


## थोडक्यात...

### अनोळखी ईसमाचा रेल्वे अपघाताने मृत्यू

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील शिवडी येथील रेल्वे पोल नंबर २२४/ ५० व २२४ /०७ या पोलदरम्यान, अंदाजे ३५ ते ४० वय वर्ष असणाऱ्या अनोळखी इसमाचा रेल्वे अपघाताने मृत्यू झाला असून निफाड पोलीस ठाणेत अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे , सविस्तर वृत्त असे की १३/ ९/ २०२३ रोजी एक अनोळखी पुरुष वय अंदाजे ३५ ते ४० वर्ष असून नाव गाव माहित नाही ,साडेपाचच्या सुमारास शिवडी शिवारात दोन पोलच्या दरम्यान मयत अवस्थेत पडलेला आढळून आला आहे, मृत व्यक्ती शरीराने सड पातळ असून रंगाने निमगोर-ाआहे ,तर चेहरा उभट असून डोक्याचे केस काळे तर अंगात पांढऱ्या रंगाचा शर्ट व आखाडी रंगाची पॅन्ट आहे तसेच उजव्या हातावर इंग्रजी अक्षरात राम लिहिलेले असून मराठीत लखन नाव गोंदलेले आहे, अशी माहिती रेल्वे कर्मचारी ट्रेक मॅन राकेश सोनसाळे यांनी निफाड पोलीस ठाण्यात दिली असून या मृत व्यक्तीचा पुढील तपास पोलीस नाईक घोलप हे करीत असून सदर मयताच्या वारसाचा शोध लागत नसून मृत व्यक्तीबाबत कोणास काही माहिती मिळाल्यास निफाड पोलीस स्टेशन ०२ ५०/ २४ १० ३३ या नंबर वर संपर्क साधावा.




### पीएनजी ज्वेलर्स'तर्फे प्रथा कलेक्शन सादर

सोलापूर : महाराष्ट्रातील आघाडीचा ज्वेलरी ब्रँड असलेल्या 'पीएनजी ज्वेलर्स'तर्फे भारतातील लग्नसराईच्या काळासाठी नववधूच्या दागिन्यांचे नावीन्यपूर्ण 'प्रथा कलेक्शन' सादर करण्यात आले आहे.डॉ.सौरभ गाडगीळ म्हणाले की,आम्ही जेव्हा पहिल्यांदाच प्रथा कलेक्शन सादर केले होते.तेव्हाच हे कलेक्शन आमच्या ग्राहकांच्या पसंतीस उतरले होते.आता मोती,जडाऊ,कुंदन आणि मीनाकारी कलाकुसरच्या जोडीने आम्ही नववधूच्या दागिन्यांच्या श्रेणीत आणखी एक उत्तम पर्याय घेऊन आलो आहोत.तसेच ऑनलाईन माध्यमाद्वारे १५ डिसेंबर २०२४ ते ३१ जानेवारी २०२५ दरम्यान विशेष मोहीम राबविली जाणार आहे.

# ऊसाला प्रति टन साडेतीन हजार रुपये भाव द्या व मागील थकीत रक्कम अदा करा अन्यथा आंदोलन करू : आनंद बुक्कानुरे

## शिवसेना उबाठा तालुकाप्रमुख आनंद बुक्कानुरे यांनी दिला आंदोलनाचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : सिद्धेश्वर साखर कारखाना सोलापुर,जयहिंद साखर कारखाना आचेगाव,गोकुळ साखर कारखाना धोत्री, व मातोश्री साखर कारखाना रुद्देवाडी, या चारही कारखान्याकड़ शेतकऱ्यांच्या उसाला प्रति टन ३५००चा भाव देण्यात यावा तसेच मागील वर्षाचे थकित ऊस बिल तात्काळ अदा करण्यात यावे अन्यथा एक जानेवारीपासून शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्यात येईल असा गंभीर इशारा शिवसेना उबाठाचे तालुकाप्रमुख आनंद बुक्कानुरे यांनी दिला आहे.

दुष्काळपरिस्थितीमुळे अक्कलकोट तालुक्यातील शेतकऱ्यांची परिस्थिती वाईट अवस्थेकडे मोड घेत असुन अतिषय वाईट परिस्थिती ओढावलेली आहे. दुष्काळीच्या तिव्रता,खताचे वाढलेले भाव,शेतमजुराचे वाढलेली पगार आणि महागाईमुळे शेतकरी होरपळत आहे.असे असतांना शेतकऱ्यांचे ऊस बील थांबुन ठेवली आहे.

सिध्देश्वरसाखर कारखाना सोलापूर यांच्यासह काही कारखाने तुटपुंजी भाव जाहिर केले आहे.ही दर शेतकऱ्यांसाठी अतिषय कमी आहे व गेल्या वर्षी जाहिर केलेल्या बिलहो वरील कारखाने अजुनपर्यत पुर्णपणे दिले नाहीत.ते तात्काळ देण्यात यावे.

प्रशासनाच्यावतीने दिनांक २८,१२,२४ रोजीच्या आत मध्ये बैठक लावून ऊस दर वाढवून देण्यासाठी व थकलेले बिल देण्यासाठी योग्य तोडगा काढावा. अन्यथा दिनांक १ जानेवारी २०२५ रोजी शिवसेना उबाठा पक्षाच्यावतीने अक्कलकोट विधानसभा क्षत्रातील शेतकऱ्यांना घेवून सिध्देश्वर कारखाना सोलापूर येथे तिव्र आंदोलन छेडण्यात येणार यांची दखल प्रशासनानी घ्यावी या आशेचे पत्र शिवसेना उबाठाचे प्रमुख आनंद बुक्कानुरे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी यांना लेखी पत्र देण्यात आले आहे.



## अंतर महाविद्यालयीन पावर लिफ्टिंग स्पर्धा २०२४-२५ स्पर्धेत कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचे यश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अंतर महाविद्यालयीन पावर लिफ्टिंग स्पर्धेत रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयास घवघवीत यश मिळाले. ही पावर लिफ्टिंग स्पर्धा शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज येथे नुकतीच पार पडली या स्पर्धेत ३७ महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला होता यामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचे सात विद्यार्थी खेळाडूंनी सहभागी झाले यामधील खालील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले

अनिश गांडुळे या खेळाडूने१०५ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक प्राप्त केला.

७६ किलो वजनी गटात कुमारी चंद्रिका बाबर बीएससी भाग दोन हिने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. पवन रुपनवर याने ९६ किलो वजनी गटात तृतीय क्रमांक प्राप्त केला. त्याचबरोबर श्रवणकुमार अवताडे ८३ किलो वजनी गटात तृतीय क्रमांक प्राप्त केला.

या सर्व यशस्वी स्पर्धकांचे अभिनंदन प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, डॉ. राजेश कवडे, अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत, डॉ. अनिल चोपडे, डॉ. उमेश साळुंखे व महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, जिमखाना विभाग सदस्य,शिक्षक कर्मचारी यांनी केले. तसेच या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक प्रा. अनिल परमार, विठ्ठल फुले, आणि मनोज खपाले यांचे मार्गदर्शन लाभले.

## कल्याणशेट्टी महाविद्यालयास विद्यापीठ परीक्षा विभाग प्रमुख डॉ. श्रीकांत अंधारे यांची सदिच्छा भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/अक्कलकोट : महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेच्या मातोश्री गुरुबसवा कल्याणशेट्टी महाविद्यालयात विद्यापीठ नियमानुसार परीक्षा विभागाचे कामकाज कार्यान्वित असून ते समाधानकारक आहे असे प्रतिपादन पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर चे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ श्रीकांत अंधारे यानी व्यक्त केले.



मातोश्री गुरुबसवा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील परीक्षा विभागाने आयोजित केलेल्या छोटेखानी कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी संस्थेचे ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांच्या हस्ते डॉ अंधारे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी समन्वयक मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, शिक्षक राजकुमार गवळी, सुरेश रुगे, सिद्रामप्पा पाटील आदी उपस्थित होते.

डॉ अंधारे यांनी महाविद्यालयातील डार्क रूम, परीक्षा हॉल, कॅप्म सेंटर, पर्यवेक्षक दालन आदींचे निरीक्षण केले. महाविद्यालयाच्या अडीअडचणी जाणून घेतल्या, विनाअनुदानित महाविद्यालय असून देखील अत्यंत शिस्तीत व सुव्यवस्थेत परीक्षा सुरू असल्याबद्दल त्यांनी व्यवस्थापन परिषदेस धन्यवाद दिले.

### विद्यापीठाच्या वतीने सर्वतोपरी सहकार्य करणार

**विनाअनुदानित महाविद्यालयांना सुविधांचा अभाव असतो, तरीदेखील ते विद्यापीठाला सहकार्य करतात, त्यांना कुठल्याही प्रकारच्या अडचणी येऊ दिली जाणार नाही. सर्व प्रकारच्या सुविधा देऊन सहकार्याची भूमिका घेऊ असे विद्यापीठ परीक्षा प्रमुख डॉ अंधारे यांनी याप्रसंगी सांगितले.**

# पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या सूचनेनुसार अक्कलकोट दक्षिण पोलिस स्टेशनमध्ये पोलिस पाटील दिन उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी

सोलापूर जिल्ह्याचे लोकप्रिय आणि कर्तव्यदक्ष पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या सूचनेनुसार अक्कलकोट दक्षिण पोलिस स्टेशन मध्ये पोलिस पाटील दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

अक्कलकोट दक्षिण पोलीस स्टेशन तर्फे १८ डिसेंबर २४ रोजी पोलीस पाटील दिन साजरा करण्यात आला.याप्रसंगी पोलीस निरीक्षक महेश स्वामी साहेब, तहसीलदार श्री. मगर साहेब व गट विकास अधिकारी कवितके साहेब यांनी पोलीस ठाणे हद्दीतील सर्व पोलीस पाटील यांना दुपारी बारा वाजण्याच्या दरम्यान पोलीस पाटील दिनाच्या शुभेच्छा दिल्या.तसेच लोकसभा व विधानसभा निवडणुकीत चांगली कामगिरी केल्याबद्दल प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. सदर वेळी सर्व पोलीस पाटील यांना केक कापून, फेटे बांधून सन्मानित करण्यात आले यापुढेही अशीच कामगिरी करावी याबाबत पोलीस निरीक्षक स्वामी साहेब, तहसीलदार मगर साहेब व गट विकास अधिकारी कवितके साहेब यांनी योग्य त्या सूचना दिलेल्या आहेत.

तसेच पोलीस ठाण्यातील गोपनीय विभाचे पोलीस सुनील माने , पोसई मिय्यावाले, व अजय भोसले इतर पोलीस कर्मचारी हजर होते.

महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील संघाटनेचे उपाध्यक्ष महादेव पाटील महाराष्ट्र राज्य सरचिटणीस सिद्धार्थ भाऊ कोळी महिला जिल्हाध्यक्षा साक्षी कोळी,महिला उपाध्यक्ष भौरंम्मा माळी,महिला तालुका अध्यक्ष रोहिणी पवार जिल्हा संघटक श्रीशैल पाटील जिल्हा विधी सल्लागार लक्ष्मीपूत्र अंदेवाडी कार्याध्यक्ष संतोष बनसोडे जिल्हा कार्यकारणी सदस्य रोहनराजे शिर्के ,सुरेश मैदर्गी, संतोष गुजा,मोहन वाघमोडे, शैलेंद्र नडगम,माणशेट्टी, महानंदा माळी,मिनाक्षी चौधरी,पवार,दयानंद पुजारी, रेश्मा पठाण, हन्नूरे, श्रीदेवी कोळी,महादेवी अरवत,मळसिद्ध कांबळे,मौलाली व्हसूर,सिध्दलिग मुनाळे, लक्ष्मी बनसोडे, आदि जण उपस्थित होते.

सोलापूर जिल्ह्यामध्ये आदरणीय पोलीस अधीक्षक श्री अतुल कुलकर्णी साहेब यांनी लोकसभा विधानसभा निवडणुकीत पोलीस पाटील यांनी केलेल्या कामाची दखल घेऊन पोलीस पाटलांसाठी एक नवीन व्यासपीठ तयार करून दिले आहेत त्याबद्दल मी महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील संघटनेच्या वतीने त्यांचा आभार व्यक्त करतो कारण जिल्ह्यामध्येच नाहीतर पूर्ण महाराष्ट्रामध्येच नव उपक्रम म्हणण्यासारखे आहे



सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुलजी कुलकर्णी यानी सोलापूर जिल्ह्यात पोलीस पाटलांना सन्मान करून सत्कार कार्यक्रम आयोजन करून ज्या त्या पोलीस स्टेशन हद्दीतील कार्यक्रम करण्यासाठी सांगितले त्या प्रमाणे दक्षिण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री महेश स्वामी व तहसीलदार श्री मगर , गटविकास अधिकारी श्री कवितेगे तसेच पोलीस कर्मचारी यांनी वेगवेगळ्या पद्धतीने सत्कार समारंभाचा कार्यक्रम आयोजन केला त्याबद्दल आम्हा पोलीस पाटलामध्ये नवचैतन्य निर्माण होऊन अधिक जोमाने काम करण्यासाठी प्रोत्साहन मिळालेला आहे तरी भविष्यामध्ये गृह विभाग व महसूल विभागतील कर्मचारी यांच्यामध्ये लोक अभीमुख कार्यक्रम असू द्या तसेच गावांमध्ये कायदा व सुव्यवस्था आबादीत ठेवणे सण- यात्रा, उत्सव, निवडणुका अशा वेगवेगळ्या प्रशासकीय यंत्रणेला सहकार्य करतात.

– **रहिमान अत्तार** (तालुकाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील संघटना, अक्कलकोट)



## रिपब्लिकन पक्षाच्या पुणे शहर उपाध्यक्षपदी राम सोनकांबळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनीधी : पुणे येथील युवा उद्दोजक राम सोनकांबळे यांची केंद्रिय मंत्री रामदास आठवले साहेब व प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या आदेशाने पुणे शहर अध्यक्ष संजय सोनवणे यांनी निवड केली आहे. यावेळी पुणे शहर कार्याध्यक्ष बसवराज गायकवाड,ठझख अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडीखांबे, पश्चिम महाराष्ट्र नेते राहुल रूही किरण सोनकांबळे आदी उपस्थित होते

**महसूल प्रशासनाचे लेखी आश्वासन, ठाणेदार विकास पाटील यांची शिष्टाई**

**मागण्या पूर्ण न झाल्यास पुन्हा उपोषण : कैलास नागरे**

# शिवनी आरमाळ लघु प्रकल्पावरील कैलास नागरे यांचे अन्नत्याग उपोषण तूर्तास स्थगित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे/बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी :

देऊळगाव राजा तालुक्यातील खडकपूर्णा प्रकल्पाचे पाणी शिवणी अरमाळसह परिसरातील लघु प्रकल्पामध्ये सोडण्यासाठी शिवनी आरमाळ लघु प्रकल्पावर सुरू असलेले शेतकरी कैलास नागरे यांचे अन्नत्याग आमरण उपोषण अखेर महसूल प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर मागे घेण्यात आले.दिनांक १५ डिसेंबर २०२४ रोजी अन्नत्याग उपोषण हजारो शेतकऱ्याच्या उपस्थितीत सुरू होते.या उपोषणाला परिसरातील अनेक गावच्या सरपंचांनी पाठिंबा दर्शवला होता. अनेक शेतकरी,सामाजिक संघटनांनी सुद्धा उपोषणाला पाठिंबा दिला होता.

शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी सुद्धा उपोषणाला भेट देऊन पाठिंबा दर्शवला होता.वाढता पाठिंबा पाहता उपोषण आणखी चिघळु नये म्हणून महसूल प्रशासनाने दखल घेत अखेर दिनांक २० डिसेंबर २०२४ रोजी मा.कार्यकारी अभियंता,जलसंपदा विभाग व जलसंधारण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली मागण्या मार्गी लावण्यासाठी बैठक आयोजित करण्यात येईल व त्याच बैठकीत मा.जिल्हाधिकारी बुलढाणा यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठकीची तारीख ठरवण्यात येईल असे लेखी आश्वासन देऊन उपोषण सोडवण्याची विनंती प्रशासनाच्या वतीने करण्यात आली होती,त्या विनंतीला मान देऊन उपोषणकर्ते शेतकरी कैलास नागरे यांनी सर्व मागण्याचे प्रश्न निकाली निघण्याचे लेखी आश्वासन मिळाल्यामुळे तूर्तास अन्नत्याग उपोषण मागे घेण्यात आले.

यावेळी प्रशासनाच्या वतीने उपविभागीय अधिकारी प्रा.संजय खडसे,मा. तहसीलदार वैशाली डोंगरजालसह महसूल प्रशासकीय अधिकारी, अंढेरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार विकास पाटील यांच्या हस्ते यांना लिंबू पाणी देऊन उपोषण सोडविले.मागण्या पूर्ण न झाल्यास पुन्हा अन्नत्याग आमरण उपोषण करण्यात येईल असे उपोषणकर्ते कैलास नागरे यांनी सांगितले.



